सुधारित प्रशासकीय मान्यता आदेश
सा.बां.वि. जळगांव

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी लोकप्रतिनिधींनी सूचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे या योजनेंतर्गत यंत्रणा बदलाबाबत

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास व पंचायतराज विभाग
शासन शुद्धिपत्रक क्रमांक: विकास-२०२४/प्र.क्र.२६७/यो-६
२५, बांधकाम भवन, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक- १५ ऑक्टोबर, २०२४.

संदर्भ :- १) ग्रामविकास विभाग,शासन निर्णय क्र. विकास-२०२४/प्र.क्र.२१५/यो-६,दि. ०९ सप्टेंबर, २०२४ (जि.प.जळगांव रक्कम रू. ५००.०० लक्ष ची यादी एकूण ९६ कामे)

शासन शुध्दीपत्रक :-

सन २०२४-२५ या वित्तीय वर्षासाठी मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे या योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या **मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, जळगांव** यांना **जळगांव** जिल्ह्याकरीता संदर्भाधीन शासन निर्णयान्वये कामांना मंजूरी देण्यात आली होती.

२. तथापि, सदर शुद्धीपत्रकाद्वारे खालील प्रमाणे यंत्रणा बदल करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे:-

संदर्भाधीन शासन निर्णयातील **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव** यांना जळगांव जिल्ह्याकरिता मंजूर करण्यात यादीतील अ.क्र. १ ते ९६ (रक्कम रू. ५००.०० लक्ष ) ही कामे **अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, जळगांव यांना वर्ग करण्यात येत आहे.**

३. सदर यंत्रणा बदल करावयाच्या कामांबाबत कार्यारंभ आदेश दिला नाही व निविदा प्रक्रिया सुरू झाली नाही, या अटींच्या अधिन राहून सदर यंत्रणा बदलास मान्यता देण्यात येत आहे.

४. या कामांसाठी प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी, निविदा काढणे, स्विकारणे इ. बाबतची कार्यवाही करुन घेण्याची जबाबदारी **कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव** यांची राहील, अशी तरतूद करण्यात येत आहे. सदर कामे दि. ३१ मार्च, २०२६ पर्यंत पूर्ण करून त्यांच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे महालेखापाल मुंबई व शासनास सादर करण्यात यावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

१५/१०/२०२४

(अभिजीत तेलवेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (ग्रा.वि) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२. अधीक्षक अभियंता, सा.बां.वि. मंडळ, जळगांव.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव.
४. कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव.
५. निवडनस्ती, कार्यासन योजना-६, ग्रामविकास विभाग.